मराठी
# न्यूज एक्सप्रेस
मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल

बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!
: ९८३४१३८४८२



# पिंपरी-चिंचवड शहराची ‘कचरा कोंडी’!

## महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाच्या नोटिशीमुळे महापालिका अडचणीत

**पिंपरी | प्रतिनिधी**

भारतीय अवकाश संशोधन संस्थेने (इस्रो) केलेल्या अभ्यासात देशातील मिथेन वायू उत्सर्जनाचे २२ ‘हॉटस्पॉट’ समोर आले होते. त्यात पिंपरी-चिंचवडमधील मोशीतील कचरा डेपोचाही समावेश होता. त्यानंतर राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने (एनजीटी) याबाबत उपाययोजनांचे निर्देश देऊनही त्याचे पालन न केल्याप्रकरणी महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने पिंपरी-चिंचवड महापालिकेला नोटीस बजावली आहे.




इस्रोच्या अभ्यासानंतर राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणाने मिथेन वायू उत्सर्जन मोठ्या प्रमाणात होणाऱ्या ठिकाणी उपाययोजना करण्यासाठी समिती नेमली होती. या समितीने मिथेन वायू उत्सर्जन थांबविण्यासाठी अनेक उपाययोजना सुचविल्या होत्या. या उपाययोजनांच्या अंमलबजावणीबाबत महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने महापालिकेला विचारणा केली होती. त्यावर महापालिकेने उत्तर दिले होते परंतु, ते मंडळाला समाधानकारक वाटले नाही. त्यामुळे मंडळाच्या अधिकाऱ्यांनी कचरा डेपोला भेट देऊन तपासणी केली. त्यानंतर मंडळाने महापालिकेला गुरुवारी नोटीस बजावली.

> करोना कालावधीतील जैववैद्यकीय कचरा मोशी कचरा डेपोत टाकलेला नाही. त्या कचऱ्यावर प्रक्रिया आणि विल्हेवाट वायसीएम रुग्णालयातील केंद्रात केली आहे. कचऱ्यावर प्रक्रिया करण्यासाठी वर्षभरापासून बायोमायनिंग पद्धत राबविण्यात येत आहे. महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने माहिती घेऊन नोटीस द्यावी. महापालिकेच्या उपाययोजनांची माहिती मंडळाला देण्यात येईल.
> - संजय कुलकर्णी, मुख्य अभियंता, पर्यावरण विभाग, पिंपरी-चिंचवड महापालिका

### मंडळाचे महापालिकेला निर्देश

- महापालिकेने नव्याने डेपोत कचरा टाकू नये.
- बायोमायनिंगसाठी कालबद्ध आराखडा सादर करावा.
- मिथेन वायू शोध यंत्रणेसोबत ठिकठिकाणी अग्निशमन यंत्रणा बसवावी.
- मिथेन उत्सर्जनावर नियमितपणे बारकाईने देखरेख ठेवावी.
- डेपोत टाकण्यात येणाऱ्या कचऱ्याची नोंद ठेवावी.
- डेपोतील १०० टक्के कचऱ्यावर प्रक्रिया करावी.

मंडळाने नोटिशीत म्हटले आहे की, करोना काळात टाकण्यात आलेल्या कचऱ्याचे बायोमायनिंग होत नसल्याचे तपासणीत आढळून आले. याचबरोबर जळालेले तेल तिथे मोठ्या प्रमाणात टाकण्यात आले आहे. मिथेन वायू संकलित करून त्याचे व्यवस्थापन करण्याची यंत्रणाही बसविण्यात आलेली नाही. मिथेन वायूच्या उत्सर्जनावर देखरेख ठेवण्याची यंत्रणाही तिथे नाही. याचबरोबर निर्माण होणाऱ्या १०० टक्के कचऱ्यावर प्रक्रिया करण्याची क्षमताही महापालिकेकडे नाही.

> पिंपरी-चिंचवड महापालिकेने १५ दिवसांत मंडळाकडे २ लाख रुपयांची बँक हमी जमा करावी. मंडळाने बजावलेल्या नोटिशीला महापालिकेने १५ दिवसांत उत्तर द्यावे. अन्यथा कायदेशीर कारवाईचे पाऊल उचलण्यात येईल.
> - जगन्नाथ साळुंखे, प्रादेशिक अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळ

# विवाह जमविण्यासाठी तडजोड महत्वाची; माजी आमदार विलास लांडे

## तेली समाजाच्या वतीने आयोजित मोफत वधु-वर पालक परिचय मेळावा

**पिंपरी | प्रतिनिधी**

आजच्या धावत्या युगात आपल्या मुला-मुलींसाठी त्या-त्या क्षेत्रातील वधू - वर शोधणे कठीण काम झालेले आहे. सध्याच्या काळात उच्चशिक्षित मुलींची संख्या समाजात जास्त असून, त्यांच्या वराबाबतच्या अपेक्षाही अवास्तव वाढत आहेत. विवाह जमविण्यासाठी तडजोड ही अतिशय महत्वाची बाब आहे, असे मत माजी आमदार विलास लांडे यांनी व्यक्त केले.



पिंपरी -चिंचवड शहर तेली समाजाच्या वतीने आयोजित मोफत वधु - वर पालक परिचय मेळाव्याच्या उद्घाटनप्रसंगी विलास लांडे बोलत होते. यावेळी सुदुंबरे येथील श्री संताजी महाराज जगनाडे तेली संस्थेचे अध्यक्ष शिवदास उबाळे, मेळाव्याच्या अध्यक्षा, वाघोली गावच्या सरपंच वसुंधरा उबाळे, अखिल भारतीय नाट्य परिषदेचे उपाध्यक्ष भाऊसाहेब भोईर, स्थायी समितीचे माजी सभापती अजित गव्हाणे, कामगार नेते सचिन लांडगे, ह.भ.प विशाल महाराज फुगे, पिंपरी-चिंचवड शहर तेली समाजाचे अध्यक्ष शिवराज शेलार आदी उपस्थित होते.

मेळाव्यात ८०० वर आणि ४५० वधुंनी नावनोंदणी केली.या प्रसंगी ५ ते ६ हजार समाजबांधव उपस्थित होते. कार्यक्रमात समाजात उल्लेखनीय कार्य केल्याबद्दल श्री. शिवदास उबाळे यांना समाजभुषण पुरस्काराने गौरविण्यात आले. संस्थेचे मुख्य सचिव संजय जगनाडे यांनी प्रास्ताविक केले.

# महापालिकेत अत्याधुनिक संकट व्यवस्थापन कक्ष

## पुणे महापालिकेच्या वतीने अत्याधुनिक संकट व्यवस्थापन कक्ष उभारला जाणार

**पुणे | प्रतिनिधी**

शहरात संकटलीन परिस्थिती निर्माण झाल्यानंतर त्यावर उपाययोजन करणे शक्य व्हावे, यासाठी पुणे महापालिकेच्या वतीने संकट व्यवस्थापन कक्ष उभारला जाणार आहे. यामध्ये अत्याधुनिक यंत्रणा उपलब्ध असणार आहेत. साडेसात हजार चौरस फूट जागेत हा कक्ष असणार आहे. यासाठी दोन कोटी रुपयांच्या खर्चाला महापालिकेच्या इस्टिमेट कमिटीच्या बैठकीत मान्यता देण्यात आली. महापालिका आणि पोलिसांनी शहरभर लावलेले सीसीटीव्ही या कक्षाला जोडले जाणार असल्याने दुर्घटनांवर लक्ष असणार आहे. त्यामुळे दुर्घटनेनंतर तातडीने मदत देणे शक्य होणार आहे.



महापालिकेचे शहर अभियंता प्रशांत वाघमारे आणि भवन रचना विभागाचे प्रमुख युवराज देशमुख यांनी ही माहिती दिली. पुणे शहराचा विस्तार चारही दिशांना मोठ्या प्रमाणात होत असून, शहरीकरणामुळे लोकसंख्येत मोठी वाढ झाली आहे. गेल्या काही वर्षांपासून पावसाळ्यात पूरजन्य स्थिती शहरात निर्माण होते. तसेच काही वेगवेगळ्या दुर्घटनाही शहरात घडत असतात. अशी काही स्थिती निर्माण झाल्यानंतर तातडीने मदत देता यावी, या हेतूने महापालिकेने हा आपत्ती व्यवस्थापन कक्ष उभारण्याचा निर्णय घेतला आहे. मुंबई महापालिकेच्या धर्तीवर हा कक्ष उभारण्यात येत आहे. पुढील चार महिन्यांत मे २०२५ पर्यंत या कक्षाचे काम पूर्ण करण्याचे नियोजन महापालिकेने केले आहे.

या कक्षासाठी ६० ते ७० कर्मचाऱ्यांची कायमस्वरूपी नियुक्ती केली जाणार आहे. पावसाळ्यामध्ये येथील कर्मचाऱ्यांची कक्षातच राहण्याची व्यवस्था असणार आहे. शहरातील महापालिका तसेच पोलिसांनी लावलेले सर्व सीसीटीव्ही या कक्षाला जोडले जाणार आहेत. यामुळे दुर्घटनांवर लक्ष ठेवले जाणार असून, दुर्घटनेनंतर तातडीने आवश्यक मदत देणे शक्य होणार आहे. संबंधित यंत्रणांशी समन्वय ठेवण्याची जबाबदारी या कर्मचाऱ्यांवर असणार आहे. त्यांना मुंबई महापालिकेच्या माध्यमातून विशेष आपत्ती व्यवस्थापनाचे प्रशिक्षणही दिले जाणार असल्याचे शहर अभियंता वाघमारे यांनी सांगितले.

### कक्षासाठी अन्य कार्यालयांचे होणार स्थलांतरण

» महापालिकेच्या जुन्या इमारतीच्या पश्चिम बाजूचा ( मेट्रो स्थानकाच्या बाजूचा) पूर्ण मजला या कक्षासाठी दिला जाणार आहे. यामध्ये अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून दिल्या जाणार आहेत. सध्या या मजल्यावर मुख्य लेखा परीक्षक, उपायुक्त ( विशेष), झोपडपट्टी पुनर्वसन आणि निर्मूलन, स्वच्छ सर्वेक्षण अभियान विभाग, बांधकाम विभाग तसेच विधी विभागाची भांडार रूम आहे. या कार्यालयाचे स्थलांतर सावरकर भवन येथील महापालिकेच्या जागेत केले जाणार आहे.

---

# 'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन' यंदा महा कुंभमेळ्याला समर्पित!

## "भक्ती-संस्कृती-परंपरा" थीमद्वारे देणार पर्यावरण रक्षणाचा संदेश : आमदार महेश लांडगे यांची माहिती

**पिंपरी | प्रतिनिधी**

'गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये नोंद झालेली आणि इंद्रायणी नदी स्वच्छता अन् संवर्धनाबाबतचा संदेश देणारी 'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन' यंदा महा कुंभमेळ्याला समर्पित केली असल्याचे भाजपा नेते तथा भोसरी विधानसभा आमदार महेश लांडगे यांनी सांगितले.

पिंपरी-चिंचवड महानगरपालिका, पिंपरी-चिंचवड पोलीस आयुक्तालय यांच्या पुढाकाराने आणि अविरत श्रमदान, सायकल मित्र-पुणे, महेशदादा स्पोर्ट्स फाउंडेशन आणि शिवांजली सखी मंच यांच्यासह विविध पर्यावरण प्रेमी संस्था, संघटना आणि स्वयंसेवीवृत्तीने काम करणारे मान्यवर या सर्वांच्या पुढाकारातून 'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन'चे आयोजन करण्यात येते.




भोसरीतील गाव जत्रा मैदानावर येत्या रविवारी, दि. 19 जानेवारी रोजी सकाळी 6 वाजता या रॅलीचे आयोजन करण्यात आले आहे.

याबाबत आमदार महेश लांडगे म्हणाले की, पर्यावरण रक्षणाचा संदेश देणे आणि युवा पिढीमध्ये सायकलिंग व नियमित व्यायाम याबाबत जनजागृती करणे. या उद्देशाने 2017 पासून आम्ही प्रतिवर्षी 'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन' आयोजित करीत आहोत. सायक्लोथॉंचे यंदा 9 वे वर्ष आहे. श्रीक्षेत्र आळंदी आणि श्रीक्षेत्र देहू अशा तीर्थक्षेत्रांना जोडणारी इंद्रायणी नदीबाबत महाराष्ट्रातील वारकरी सांप्रदायामध्ये विशेष महत्त्व आहे. नदी प्रदूषणामुळे इंद्रायणीचे अस्तित्व धोक्यात आले आहे. अशा पवित्र इंद्रायणीला गतवैभव प्राप्त करुन देण्यासाठी 'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन' ही मोहीम हाती घेण्यात आली आहे.

'रिव्हर सायक्लोथॉन'च्या आयोजनासाठी पुढाकार घेतात. पिंपरी-चिंचवड आणि परिसरातील सुमारे 35 हजार सायकलपटू युवक-युवती आणि अबालवृद्ध सायकल रॅलीमध्ये सहभागी होतात. गतवर्षी रिव्हर सायक्लोथॉनची 2022 मध्ये ' गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड' मध्ये नोंद झाली आहे. 'सायकलची सर्वात मोठी रांग' हे रेकॉर्ड, गिनीज वर्ल्ड रेकॉर्ड्स मध्ये नोंदवण्यात आले, ही बाब तमाम पिंपरी-चिंचवडकर आणि पर्यावरणप्रेमींसाठी निश्चितच अभिमानाची आहे. हा अभिमान जपण्यासाठी सोबतच शहराच्या पर्यावरणाचे रक्षण करण्यासाठी चळवळ नागरिकांच्या मनातून निर्माण करणे आवश्यक आहे हाच उदात्त हेतू ठेवून प्रतिवर्षी या उपक्रमाचे आयोजन केले जाते.

तसेच, 'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन'मध्ये पर्यावरण प्रेमी, सायकलपटू आणि सर्वसामान्य नागरिकांना सहज सहभागी होता यावे. या करिता HTTPS://RIVERCYCLOTHON.IN/ हे संकेतस्थळ निर्माण केले आहे. याद्वारे ऑनलाईन पद्धतीने नागरिकांनी सायक्लोथॉनसाठी नोंदणी करावी. सायक्लोथॉनमध्ये सहभागी होण्यासाठी कोणतेही शुल्क आकारले जात नाही. त्यामुळे यावर्षी विक्रमी सहभाग नोंदवावा, असे आवाहन आमदार लांडगे यांनी केले आहे.

> भारतीयांचे श्रद्धास्थान प्रयागराज, उत्तरप्रदेश येथे महाकुंभ मेळा सुरु आहे. १२ वर्षांनंतर होणारा हा जगातील सर्वात मोठा अध्यात्मिक सोहळा आहे. त्यामुळे यावर्षीची 'इंद्रायणी रिव्हर सायक्लोथॉन' कुंभमेळ्याला समर्पित केली आहे. "भक्ती-संस्कृती-परंपरा" अशी थीम आहे. नदी स्वच्छता, पर्यावरण रक्षण असा उदात्त हेतू ठेवून आयोजित केलेल्या या उपक्रमासाठी जास्तीत जास्त सहभाग द्यावा. पर्यावरण संवर्धनाची चळवळ प्रत्येकाच्या मनात जागृत व्हावी, अशी अपेक्षा आहे.
> **- महेश लांडगे, आमदार, भोसरी विधानसभा, भाजपा.**

# पीएमआरडीएकडून अर्थसंकल्पाच्या केवळ 20 टक्के खर्च

## येत्या तीन महिन्यांमध्ये आणखी 30 टक्के निधी खर्च करण्याचे उद्दिष्ट आहे, त्यामुळे महत्त्वाचे प्रकल्प या नव्या वर्षात मार्गी लागण्याची शक्यता

**पिंपरी | प्रतिनिधी**

विविध विकासकामे आणि प्रकल्पासाठी पुणे महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून (पीएमआरडीए) विकासकामांवर ६०० ते ६५० कोटी रुपयांपर्यंतच खर्च करण्यात आला आहे. मूळ अर्थसंकल्पाच्या तुलनेत आत्तापर्यंत खर्च झालेली रक्कम ही २० टक्क्यांच्या आत आहे. येत्या तीन महिन्यांमध्ये आणखी ३० टक्के निधी खर्च करण्याचे उद्दिष्ट आहे. त्यामुळे महत्त्वाचे प्रकल्प या नव्या वर्षात मार्गी लागण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

गेल्या चार महिन्यांपूर्वी पीएमआरडीएचे तत्कालीन अध्यक्ष आणि आत्ताचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या अध्यक्षतेखाली २०२४-२५ या आर्थिक वर्षासाठी ३ हजार ८३८ कोटी जमा-खर्चाचा अर्थसंकल्प मंजूर करण्यात आला होता. मुळातच हा अर्थसंकल्प मंजूर होण्यास उशीर झाला. प्राधिकरणाची संपूर्ण यंत्रणा १६ मार्च २०२४ रोजी लोकसभा निवडणुकांसाठी कामाला लागली होती. प्राधिकरणाचे अतिरिक्त आयुक्त हे मावळ लोकसभा मतदारसंघात मुख्य निवडणूक निर्णय अधिकारी होते. परिणामी, या कालावधीत खर्च करता आला नाही. त्यानंतर १९ एप्रिल ते १ जून या कालावधीत देशात सात टप्प्यांमध्ये निवडणुका झाल्या. तर, ४ जूनला निकाल जाहीर करण्यात आला. त्यानंतर ही आचारसंहिता शिथिल झाली. दरम्यान, प्राधिकरण सभेसाठी तत्कालीन मुख्यमंत्र्यांना वेळ न मिळाल्याने २४ सप्टेंबरला अर्थसंकल्पासाठी मुहूर्त सापडला. अन् तो घाई-घाईने मंजूर करून घेतला.

दरम्यान, पीएमआरडीएचा अर्थसंकल्प मंजूर झाल्यानंतर अवघ्या २१ दिवसांत म्हणजे १५ ऑक्टोंबरला विधानसभा निवडणुकांसाठी आचारसंहिता जाहीर झाली. २० नोव्हेंबरला मतदान आणि २३ नोव्हेंबरला निकाल जाहीर करण्यात आला. त्यानंतरच आचारसंहिता शिथिल झाली. त्यामुळे अर्थसंकल्प मंजुरीनंतरही पीएमआरडीएला विकासकामे करण्यासाठी पुरेसा अवधी मिळाला नाही. त्यानंतर जिल्ह्यातील विकासकामांना वेग आला. पहिल्या टप्प्यातच ४० पेक्षा अधिक निविदा काढण्यात आलया. त्यामध्ये एकाच वेळी अडीचशे ते तीनशे कोटी रुपयांची कामे प्रगतीपथावर असल्याचे सांगण्यात येत आहे.

### मेट्रोचा निधी केंद्राकडून प्रलंबित

» पीएमआरडीए मार्फत उभारण्यात येत असलेला २३ किलोमीटर लांबीचा व सुमारे ८ हजार कोटी रुपयांचा मेट्रो मार्ग ३ हा प्रकल्प आहे. आजपर्यंत या कामाचे ८० टक्के काम झाले आहे. दरम्यान, या प्रकल्पासाठी केंद्रातून निधी येणे बाकी आहे. दोन वर्षांपूर्वी म्हणजेच नोव्हेंबर २०२३ मध्ये केंद्राकडून ४१० कोटी रुपयांचा निधी प्राप्त झाला होता. त्यानंतर पुन्हा मदत मिळणे बाकी आहे.आणखी २०० कोटी रुपयांचा निधी मिळावा यासाठी पाठपुरावा सुरू आहे.

### उत्पन्नात 900 कोटी रुपयांची भर

» पीएमआरडीएला या वर्षामध्ये तब्बल ९०० कोटी रुपये उत्पन्न वेगवेगळ्या माध्यमातून प्राप्त झालेले आहे. त्यातच आता सेक्टर १२ या गृहप्रकल्पाच्या माध्यमातून आणखी भर पडणार आहे. तसेच, मोशी येथील मोशी आंतरराष्ट्रीय प्रदर्शन केंद्र यातून मिळणाऱ्या भाड्यापोटीदेखील रक्कम जमा होणार आहे. त्यामुळे येत्या तीन महिन्यांमध्ये उत्पन्नात मोठी वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात येत आहे.

### तीन महिन्यांमध्ये 30 टक्के खर्च वाढणार

» पीएमआरडीए प्रशासनापुढे २०२४-२५ या आर्थिक वर्षातील उर्वरित तीन महिन्यांमध्ये अर्थसंकल्पातील विकासकामांवर खर्च कमी झाला. तथापि, आता सुधारित अर्थसंकल्प सादर केला जाणार आहे. जानेवारी ते मार्च अशा उर्वरित तीन महिन्यांमध्ये आणखी ३० टक्के खर्च होईल अशी अपेक्षा आहे. मात्र अर्थसंकल्पातील सर्व तरतूद खर्ची पडणार नसल्याने आता सुधारित अर्थसंकल्प प्राधिकरण सभेच्या मंजुरीसाठी सादर करावा लागणार आहे.

# जप्त केलेल्या मालमत्तेचे सील तोडल्याप्रकरणी गुन्हा दाखल

## सरस्वती इंग्लिश मीडियम हायस्कूल अँड कॉलेज, पवारवस्ती, कुदळवाडी, चिखली या मालमत्तेचे सील तोडून आतमध्ये प्रवेश केल्याप्रकरणी चिखली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल

**पिंपरी | प्रतिनिधी**

महानगरपालिकेचा मालमत्ता कर न भरल्याने जप्त करण्यात आलेली सरस्वती इंग्लिश मीडियम हायस्कूल अँड कॉलेज, पवारवस्ती, कुदळवाडी, चिखली या मालमत्तेचे सील तोडून आतमध्ये प्रवेश केल्याप्रकरणी चिखली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे.

सुरेश विठ्ठल जाधव (रा. चिखली, पिंपरी-चिंचवड, पुणे) यांच्यावर (दि. ७ जानेवारी २०२५) चिखली पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. या प्रकरणी चिखली विभागीय कार्यालयातील सहाय्यक मंडलाधिकारी बाळु रामचंद्र लोंढे यांनी फिर्याद दिली. त्यानुसार भारतीय न्याय संहिता २०२३ कलम ३२९ (३) नुसार गुन्हा दाखल केला आहे. पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या करसंकलन विभागाच्या वतीने मालमत्ता कर वसुलीसाठी विविध मोहीम राबवल्या जातात. मालमत्ताधारकांना कर भरण्याचे वारंवार आवाहन करण्यात येते. वेळप्रसंगी नोटीस देण्यात येते. मात्र, त्यानंतरही मालमत्ता कर न भरल्यास मालमत्ता जप्त करून ती सील करण्यात येते. पण जप्त केलेल्या मालमत्तेचे सील अनाधिकृतपणे तोडून कर न भरताच मालमत्तेत प्रवेश केल्याचा प्रकार चिखलीत घडला आहे.




चिखली कर संकलन विभागीय कार्यालयाच्या अंतर्गत गट क्र. ७९४ पवारवस्ती, कुदळवाडी येथे सरस्वती इंग्लिश मीडियम हायस्कूल अँड कॉलेज आहे. ही मालमत्ता सुरेश विठ्ठल जाधव यांची आहे. या मालमत्तेची कर थकबाकी रक्कम व चालू वर्षाची मालमत्ता कराची रक्कम आणि लागलेल्या दंडाची रक्कम अशी एकूण २४,५९,८३८ रुपये तर, अवैध बांधकाम शास्ती कर रुपये ३०,८९,२२६ रुपये अशी एकूण रक्कम ५५,४९,०६४ रुपये येणे बाकी आहे. त्यापैकी अवैध बांधकाम शास्ती कर वगळून २४,५९,८३८ रुपये एवढा मालमत्ता कर भरल्यास अवैध बांधकाम शास्ती कर रुपये ३०,८९,२२६ रुपये माफ होणार आहे. मालमत्ता कर थकबाकी भरण्याबाबत वारंवार मालमत्ताधारक सुरेश विठ्ठल जाधव यांना कळवण्यात आले होते. परंतु त्यांनी त्यास टाळाटाळ केल्याने अखेर ३१ डिसेंबर २०२४ रोजी चिखली कर संकलन कार्यालयाने सदर मालमत्ता जप्त करून सील केली होती. मागील आठवड्यात जप्तीची कारवाई करतेवेळी मालमत्ताधारक सुरेश जाधव यांनी पाच लाख रुपये भरतो, असे सांगितले. परंतु किमान ५० टक्के रक्कम ताबडतोब भरावी व उर्वरित रकमेचा पोस्ट डेटेड धनादेश द्यावा , अशा संबंधितांना सूचना दिल्या. परंतु त्यांची मालमत्ता कर भरण्याची मानसिकता नसल्याने त्यांनी मालमत्ता कर भरला नाही. त्यामुळे त्यांच्या मालमत्तेवर जप्तीची कारवाई करण्यात आली आहे.

> पिंपरी-चिंचवड कर संकलन विभागाने मालमत्ता कर थकबाकीदारांसाठी मोहीम हाती घेतली आहे. ज्या मालमत्ताधारकांकडे मोठ्या प्रमाणात थकबाकी आहे व त्यांना वारंवार नोटीस देऊनही ते थकबाकी भरत नसतील, तर अशा मालमत्ता जप्त करून सील करण्यात येत आहे. जप्त केलेल्या मालमत्तांचे सील तोडल्यास संबंधित व्यक्तीवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल.
>
> -अविनाश शिंदे, सहाय्यक आयुक्त, करसंकलन विभाग, महापालिका

# कृत्रिम बुद्धिमत्ता जागतिक परिवर्तनाची नांदी : शरद पवार

## बारामती कृषी विज्ञान केंद्राच्या कृषक 2025 या कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी पवार बोलत होते.

**पुणे | प्रतिनिधी**

कृत्रिम बुद्धिमत्ता ही जागतिक परिवर्तनाची नांदी मानली जात आहे. या तंत्रज्ञानामुळे शेती, उद्योग ,आरोग्य तसेच शिक्षण क्षेत्रात अमुलाग्र बदल घडतील असा विश्वास खासदार शरद पवार यांनी व्यक्त केला आहे. या तंत्रज्ञानाद्वारे उसाचे एकरी १२० टन उत्पादन शक्य असल्याचे मत पवार यांनी व्यक्त केले.

बारामती कृषी विज्ञान केंद्राच्या कृषक २०२५ या कृषी प्रदर्शनाच्या उद्घाटन समारंभ प्रसंगी पवार बोलत होते. कार्यक्रमास यावेळीमुख्यमंत्री अजित पवार, कृषिमंत्री माणिकराव कोकाटे, पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे, क्रीडामंत्री दत्तात्रय भरणे,खासदार सुप्रिया सुळे, खासदार सुनेत्रा पवार, ऑक्सफर्ड युनिव्हर्सिटी संचालक अजित जावकर, नाबार्डच्या रश्मी दराड, मायक्रोचे इंडियाचे चेअरमन राजेंद्र बारवाले, एग्रीकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टचे विश्वस्त प्रतापराव पवार, चेअरमन राजेंद्र पवार आदी मान्यवर यावेळी उपस्थित होते.

पवार म्हणाले की, ए आय तंत्रज्ञान शेतकऱ्यांसाठी उपयुक्त ठरणारे आहे. महाराष्ट्र राज्यात कृषी क्षेत्रात उसाच्या शेतीवर मोठ्या प्रमाणावर अर्थकारण अवलंबून आहे.उसाचे क्षेत्र मोठ्या प्रमाणावर आहे. त्यामुळे कृषी विज्ञान केंद्राच्या माध्यमातून उसाच्या पिकाच्या उत्पादन वाढीसाठी या तंत्रज्ञानाद्वारे लक्ष केंद्रित केले आहे. कमीत कमी पाणी व कमी उत्पादन खर्चात भरघोस उत्पादन या तंत्रज्ञानाने शक्य आहे. महाराष्ट्रात त्याचे प्रयोग सुरू आहेत. १ हजार शेतकरी या तंत्रज्ञानाचा वापर ऊस पिकासाठी करीत आहेत. जागतिक स्तरावरील मायक्रोसॉफ्ट तसेच ऑक्सफर्ड विद्यापीठ या दोन संस्था कृषी विज्ञान केंद्रशी जोडल्या गेल्या आहेत.

या संस्थांच्या माध्यमातून कृत्रिम बुद्धिमत्तेचे तंत्रज्ञान शेतकऱ्यांच्या बांधापर्यंत पोहोचणार आहे. नवीन तंत्रज्ञानाबरोबरच सुधारित वानांची देखील गरज असल्याचे पवार म्हणाले. जिरायती शेतीचे प्रमाण देखील मोठ्या प्रमाणात असून जिरायत भागातील शेतकऱ्यांना आश्वासक उत्पादन मिळवून देण्यासाठी प्रयत्न करणे गरजेचे आहे. कृषी विज्ञान केंद्रच्या माध्यमातून ते शक्य असल्याचे पवार म्हणाले. केंद्राने राज्य सरकारची मदत यासाठी घ्यावी लागेल. बारामतीत सुरू असलेल्या या तंत्रज्ञानाचा लाभ राज्यातील कानाकोपऱ्यातील शेतकऱ्यास झाल्यास शेतकऱ्यांचे जीवन समृद्ध होईल असे मत पवारांनी व्यक्त केले. कृषी प्रदर्शन पाहून पंकजा मुंडे म्हणाल्या की, बारामतीकडून खूप काही शिकण्यासारखे आहे. लोकसंख्या वाढत आहे उत्पादन वाढवावे लागणार आहे त्याचा दर्जाही टिकवावा लागेल. ये आय तंत्रज्ञानाद्वारे हे शक्य होणार आहे.



### राज्याबरोबरच केंद्राच्या कृषी विभागाची मदत घेणार : माणिकराव कोकाटे

» कृषी क्षेत्रात बदल करण्यासाठी राज्याबरोबरच केंद्राच्या कृषी विभागाची मदत घेणार असल्याचेही अजित पवार यावेळी म्हणाले. संशोधन तंत्रज्ञानाचा वापर ज्या प्रमाणात व्हायला पाहिजे त्या प्रमाणात आपल्याकडे होत नाही. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानामुळे यंदाच्या कृषी प्रदर्शनाला वेगळी उंची प्राप्त झाल्याचे अजित पवार म्हणाले. राज्याचे कृषी आयुक्त यांना कृषी प्रदर्शन पाहण्यास सांगणार असून जिल्हाधिकारी तसेच जिल्ह्यातील सर्व तालुका कृषी अधिकारी यांनी कृषी प्रदर्शन पहावे असे आदेश काढण्याच्या सूचना त्यांनी यावेळी कृषी मंत्री माणिकराव कोकाटे यांना केल्या

### जागतिक तंत्रज्ञान आता बारामतीत

» खासदार सुप्रिया सुळे म्हणाल्या की, विद्या प्रतिष्ठान व ॲग्रिकल्चरल डेव्हलपमेंट ट्रस्टच्या माध्यमातून बारामती येथील विद्या प्रतिष्ठान येथे कृत्रिम बुद्धिमत्ता लॅब कोर्स सुरू झाला आहे. गेले सहा महिन्यापासून ही लॅब सुरू झाली आहे. देश पातळीवरील तसेच जागतिक तंत्रज्ञान आता बारामतीत आत्मसात करता येणार आहे.

### कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान महत्त्वाचे

» राजेंद्र पवार म्हणाले की, गेले दहा वर्षात प्रदर्शनाला लाखो शेतकऱ्यांनी भेट दिली. प्रदर्शनाचा शेतकऱ्यांना फायदा झाला. भविष्यात शेतकऱ्यांना ग्लोबल वार्मिंगला सामोरे जावे लागणार आहे. त्यामुळे खरीप रब्बी हंगामी शेती कालबाह्य होण्याच्या मार्गावर आहे. त्यामुळे कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान येथून पुढील काळात महत्त्वाचे ठरेल.

# आजी-माजी आमदारांमध्ये होर्डिंग वॉर; सासवडनध्ये होर्डिंगच्या विळख्यात महापुरुष आडकले

## आजी-माजी आमदारांच्या लागलेल्या मोठं मोठ्या बँनरमुळे चर्चेत आले आहे, परंतु याच बॅनरमुळे नगरपरिषदेमध्ये असणारे राष्ट्रपुरुषांचे पुतळे झाकले गेले आहेत

**पुणे | प्रतिनिधी**

पुरंदर तालुक्यातील सासवड नेहमीच वेगवेगळ्या मुद्याने चर्चेत असते. कधी राजकारण तर कधी समाजकारण. तर कधी अवैद्य व्यवसाय सासवड आता आजी-माजी आमदारांच्या लागलेल्या मोठं मोठ्या बँनरमुळे चर्चेत आले आहे. परंतु याच बॅनरमुळे नगरपरिषदेमध्ये असणारे राष्ट्रपुरुषांचे पुतळे झाकले गेले आहेत; परंतु यावर मुख्य अधिकारी तथा प्रशासक यांच्याकडून कोणतीही कारवाई केली जात नसल्याने नगरपरिषदेने झोपेचे सोंग घेतले आहे का, असा सवाल आता उपस्थित केला जात आहे.



महापुरुषांचे पुतळे झाकल्यामुळे समाजामध्ये होर्डिंग धारकांच्यावर तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. तर नगरपरिषद प्रशासनाने डोळ्यावर पट्टी बांधली असल्याची चर्चा सध्या तालुक्यात रंगत आहे. मागील काळात महायुतीच्या महाविजयाच्या शुभेच्छा देण्यासाठी शिवतीर्थावरील छत्रपती शिवाजी महाराजांच्या पुतळ्याच्या पाठीमागे देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे, अजित पवार आणि विजय शिवतारे यांचे मोठे होर्डिंग लावले आहेत.

तर आता नगरपरिषदेसमोर संजय जगताप आणि विजय शिवतारे यांच्यात मोठा बॅनर वॉर रंगताना दिसत आहे. आजी-माजी आमदारांच्या कार्यकर्त्यांनी सासवड नगर पालिकेच्या समोर लावलेल्या होर्डिंग्ज मुळे मोठ्या चर्चेला उधाण आले आहे. याबाबत सासवड नगरपरिषदेचे मुख्य अधिकारी कैलास चव्हाण यांच्याशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता संपर्क होऊ शकला नाही.

### शायरीद्वारे आजी-माजी आमदारांचे टोमणे

» माजी आमदार संजय जगताप यांच्या बँनरमध्ये काळोख कितीही घनदाट असला तरी सूर्याला थांबविण्याची ताकत परमेश्वराने अजून कोणाला दिलेली नाही असा आशय नमूद केला आहे. तर जगताप यांच्या दुसऱ्या बॅनर वर शेरो शायरी करण्यात आली आहे. कुछ लोग हमारा नाम मिटाना चाहते है,नादान है वो लोग जो, समंदर को सुखाना चाहते है अशा शायरी आहेत. दुसऱ्या बाजूला आमदार विजय शिवतारे यांच्या कार्यकर्त्यांनी लक्ष 2025 सासवड नगरपरिषदचा उल्लेख करत बॅनरवर मै समंदर से भी गहरा हू तुम किटने कंकड फेकोगे चून चून कर आगे बढुंगा मै तुम मुझको कब तक रोकोंगे अशी शायरी लिहिली आहे. विशेष म्हणजे या बॅनर वर उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांचा हसतानाचा फोटो लावला आहे, त्यामुळे संपूर्ण तालुक्यात या बॅनर वॉरची चर्चा मोठी रंगलेली दिसत आहे. सासवड (ता. पुरंदर) : नगरपरिदेच्या आवारात लावण्यात आलेल्या बॅनबाजीमुळे महापुरुषांचे पुतळे झाकोळले गेले आहे.